नि.फौ.ख.क्र.१५२/२०२२
शासन विरुध्द सनी
नि.क्र.२२

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ चा उलटतपास शपथेवर सुरु**
**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्रीमती देवकर</u>**

**२.** मी गणपती आळी वाई येथे माझ्या लहानपणापासुन राहायला आहे. तेथुन वाई पोलीस ठाणे १० ते १५ मिनिटाच्या अंतरावर आहे. मी सातारा येथुन द्राक्षे खरेदी केली होती. हे म्हणणे खरे आहे की ती खरेदीची पावती मी पोलीसांना तपासकामी दिली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की आरोपीशी माझी ओळख असण्याचे कोणतेही कारण नाही. हे म्हणणे खरे आहे की दि.०१.०३.२०२२ रोजी माझ्याकडे लाकडी पेटीमध्ये किती पैसे होते या बाबत निश्चीत असे सांगता येणार नाही. मी दि.०५.०३.२०२२ रोजी सायंकाळी ०५.०० वाजता पोलीसांत घटनेची तक्रार दिली होती. हे म्हणणे खरे आहे की कथीत चोरीच्या घटनेची माहिती मला त्याच दिवशी सकाळी दहा वाजता कळाली होती. कथीत सीसीटीव्ही फुटेज पोलीसांनी माझ्याकडून जप्त केले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की सीसीटीव्ही फुटेज पाहिल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की प्रत्यक्षात कथीत चोरी कुणी केली या बाबत मला माहिती नव्हते, ती चोरी अज्ञात व्यक्तीने केली होती. हे म्हणणे खरे नाही की आरोपी विरुध्द इतर खोटे गुन्हे दाखल असल्याने त्याने चोरी केली असे मी सरतपासात खोटे सांगितले आहे. हे म्हणणे खरे नाही की माझ्या दुकानातुन द्राक्षाचे कॅरेट तसेच रोख रु.२,४००/- चोरीला गेल्याचे मी खोटे सांगत आहे.

**३.** हे म्हणणे खरे आहे की अरबाज याकुब शेख व मंजुर मुनिर बागवान हे माझ्या ओळखीचे आहेत. तसेच अमीर रशिद बागवान, आशिष रमेशसिंग डाळवाले, रवि अंकुश जाधव व रविंद्र जयराम मुकणे हे देखील माझ्या ओळखीचे आहेत. हे म्हणणे खरे नाही की आरोपीचा कथीत गुन्हयात कोणताही समावेश नाही व मी त्याच्या विरुध्द खोटी फिर्याद दिली.

**उलटतपास पुर्ण**
**फेरतपास काहीही नाही**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत,
*स्वाक्षरी/-*
दि.२१.१२.२०२३ (आर.एम. भेंडे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, वाई.